# नागपूर महानगर नियोजन समिती निवडणूक—२०१५

## मतमोजणी प्रशिक्षण वर्गात आपल्या सर्वांचे हार्दिक स्वागत

# नागपूर महानगर नियोजन समिती निवडणूक-२०१५

## प्रथम मतमोजणी प्रशिक्षण

## दिनांक :-१४/५/२०१५

## स्थळ :- बचत सभागृह, जि.का. नागपूर

नागपूर महानगर नियोजन समिती निवडणूक–२०१५

**नागपूर महानगर नियोजन समितीच्या निवडणूकीची मतमोजणी मंगळवार दिनांक १९.५.२०१५ रोजी दुपारी १२.०० वाजेपासून सुरु होत आहे. या निवडणूकीत २ मतदार संघ असुन मतदार संघनिहाय मतमोजणी करण्यात येणार आहे. ही मतमोजणी पसंती मतानुसार करण्यात येईल.**

# एक किंवा एकापेक्षा अधिक जागांसाठी Single Transferable Vote पध्दतीने मतमोजणी

**मतपत्रिका छाननी करणे-**

सर्वप्रथम मतमोजणी अधिकारी हे त्यांना प्राप्त झालेल्या मतपत्रिकांची तपासणी करुन त्यामधील अवैद्य मतपत्रिका वेगळया करतील मतपत्रिका खालील कारणासाठी अवैद्य समजण्यात यावी.

## १. ज्या मतपत्रिकेवर

- १ हा आकडा घातलेला नसेल,
- १ हा आकडा एकापेक्षा अधिक उमेदवारांच्या नावासमोर घातलेला असेल,
- १ हा आकडा, तो कोणत्या उमेदवाराला देण्यासाठी घातलेला आहे याबाबत संदेह निर्माण होईल, अशा प्रकारे घातलेला असेल, एकाच उमेदवाराच्या नावासमोर १ आणि त्याबरोबर २,३ इत्यादी आकडे देखील घातलेले असतील,
- पसंतीक्रम आकडयांऐवजी शब्दांमध्ये दर्शविलेला असेल,
- मतदारांची ओळख पटु शकेल अशी कोणतीही खुण किंवा लेखन असेल, आणि

असे आकडे घालण्यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांने दिलेल्या जांभळयारंगाचा स्केच पेन व्यतिरिक्त अन्य साधनाने कोणताही आकडा घातलेला असेल,

## २. निवडून येण्यासाठी मतांचे निर्धारीत मुल्य (Quota) ठरविणे.

- एका जागेच्या निवडणूकीमध्ये एका मतांचे मूळ मुल्य एक निर्धारीत करण्यात यावे.
- निवडणूकीमध्ये एकापेक्षा जास्त उमेदवार निवडून द्यावयाचे असल्यास एका मतांचे मूळ मूल्य १०० निर्धारीत करण्यात यावे.
- सर्वप्रथम मतदानातील वैद्य ठरलेल्या मतपत्रिकांची मोजणी करावी. त्यानंतर खालील सुत्राचा उपयोग करुन निर्धारीत मतमुल्य (Quota) निश्चित करावा.

# नागपूर महानगर नियोजन समिती निवडणूक–२०१५

**सुत्र :-** $\dfrac{\text{एकूण वैद्य मते x मताचे निर्धारीत मुल्य}}{\text{निवडून द्यावयाच्या उमेदवाराची संख्या + १}}$ **= येणारा भागाकार + १ = निर्धारीत मतमूल्य (Quota)**

(टिप :- भागाकारातील येणारा अपूर्णांक दुर्लक्षित करण्यात आला आहे)

# नागपूर महानगर नियोजन समिती निवडणूक–२०१५

- एकूण वैद्य मतपत्रिकांचे मूल्याला निवडून द्यावयाच्या उमेदवारांच्या संख्येमध्ये एक मिळवून येणाऱ्या संख्येनी त्यास भागावे व येणाऱ्या भागाकारामध्ये एक मिळवावात्र त्यानंतर येणारी बेरीज निवडून येण्याकरता निर्धारीत मतमुल्य (Quota) असेल, भागाकरातील येणारा अपूर्णांक दूर्लक्षित करावा.

- एकापेक्षा जास्त जागेकरीता निर्धारीत मतमुल्य (Quota) ठरविणे.

  उदा. ६ जागेसाठी ६० मते वैद्य आहेत. एका जागेकरीता मताचे मूळ मूल्य १०० निर्धारीत करण्यात आले आहे. वरील सुत्राचा उपयोग करुन खालीलप्रमाणे मतमुल्य (Quota) निर्धारीत करावे.

# नागपूर महानगर नियोजन समिती निवडणूक–२०१५

- एकूण वैद्य मते x  मताचे निर्धारीत मूल्य
- ...........................................येणारा भागाकार+ १ = निर्धारीत मतमुल्य (Quota)निवडून द्यावयाच्या उमेदवारांची सख्यां + १
- ६० x १००
- ..................... = ८५७.१ + १ = ८५८.१ निर्धारीत मतमुल्य (Quota)

६ + १

६०००

............... = ८५७.१ + १ = ८५८ निर्धारीत मतमुल्य (Quota)

७

(टिप :- भागाकारातील येणारा अपूर्णांक दूर्लक्षित करण्यात आला आहे. )

## मतमोजणी

- प्रत्येक उमेदवाराला मिळालेल्या प्रथम पसंतीच्या मतांची विभागणी करुन प्रत्येक उमेदवाराच्या नावासमोर
- प्रथम पसंतीच्या मिळालेल्या मतांची नोंद घेण्यात यावी.
- जर उमेदवारास किंवा उमेदवारांना प्रथम पसंतीच्या मतांची संख्या निर्धारीत कोटा किंवा त्यापेक्षा जास्त असेल तर असे उमेदवार निवडून आलेत असे समजावेत.
- कोटयापेक्षा जास्त मिळालेल्या अधिक मतमूल्यांची संख्या वेगळी काढण्यात यावी व या मतांना अधिकचे मूल्य (Surplus quota) असे समजावे व त्यांची विभागणी प्रथम करणे आवश्यक आहे.

अशा निवडून आलेल्या उमेदवाराच्या सर्व मतपत्रिकातील द्वितीय पसंतीची मते किंवा पुढील क्रम लक्षात घ्यावा.

- ज्या ज्या उमेदवारांना मिळाली आहेत. त्याप्रमाणे विभागणी करण्यात यावी.
- खालील सुत्राप्रमाणे अधिकचे मूल्य वाटपाकरीता एका मताचे मूल्य निर्धारीत करावे लागेल. त्याकरिता उमेदवाराला प्राप्त झालेल्या मतपत्रिकेत द्वितीय किंवा त्यापुढील पंसती क्रमांक नोंदविले नसतील अशी मतपत्रिका बाद करुन उर्वरित मतपत्रिका वाटपाकरीता विचारात घ्याव्यात.

- अधिकचे मूल्य वाटपाकरीता एका मताचे मूल्य निर्धारण खालीलप्रमाणे करण्यात यावे.
- एकुण अधिकचे मूल्य (Surplus Quota) = मिळालेले एकूण मतमूल्य - निर्धारीत मतमूल्य (Quota)
- एकुण अधिकचे मूल्य (Surplus Quota)
- ...................................................... = अधिकचे मूल्य वाटपाकरीता एका मताचे मूल्य
- एकूण द्वितीय/पुढील पसंतीची असलेली मते
- (टिप - भागाकारातील येणारा अपूर्णांक दुर्लक्षित करण्यात यावा.)

उदा. समजा निर्धारीत मतमूल्य ८५८ आहे. निवडुण आलेल्या उमेदवाराला पहिल्या पसंतीचे १० मते मिळाली आहे. तर उमेदवाराला मिळालेल्या मताचे एकूण मुल्य १००० (एकूण मते १० x मताचे मुल्य १०० = १००० ) होईल. उमेदवार निवडुण आला असल्यामुळे त्यांच्याकडे १४२ (अधिकचे मूल्य Surplus) आहे. १००० (एकुण मतांचे मूल्य) - ८५८ (निर्धारीत मतमुल्य Quota) = १४२ (अधिकचे मूल्य Surplus quota)

खालील सुत्राप्रमाणे अधिकचे मूल्य वाटपाकरीता एका मतांचे मूल्य निर्धारित करावे लागेल त्याकरिता उमेदवाराला प्राप्त मतपत्रिकेत द्वितीय किंवा त्यापुढील पसंती क्रमांक नोंदविले नसतील अशी मतपत्रिका बाद करुन उर्वरित मतपत्रिका वाटपाकरीता विचारात घ्याव्यात.

Surplus Quota = 142

Unexhausted Ballot Paper = 10

New value of each such transfered ballot paper

$= \frac{142}{10} = 14.2$

= 14

(टिप : भागाकारातील येणारा अपूर्णांक दूर्लक्षीत करण्यात आला आहे. दूर्लक्षीत करण्यात आलेल्या अपूर्णांकाची नोंद निकाल पत्रकाच्या खालील भागात Fraction शिर्षकांतर्गत नमूद करावी.)

पुढील शर्यतीत असणाऱ्या उमेदवाराला मिळालेल्या द्वितीय/पुढील पसंतीच्या मतांना वरिल मुल्याने गुणाकार करुन तेवढे मूल्य त्या - त्या उमेदवाराच्या प्रथम क्रमांकाच्या मूल्यांमध्ये मिळविण्यात यावीत. या मिळालेल्या मुल्यांना स्वतंत्र गठ्ठा (Parcel) क्रमांक देण्यात यावा व प्रत्येक मतांचे मूल्य पार्सलवर लिहून ठेवण्यात यावे

- **एकापेक्षा जास्त उमेदवारांना निर्धारीत कोट्यापेक्षा अधीक मते मिळाल्यास अशा सर्व उमेदवारांच्या अधीकच्या मुल्याचे (Surplus Quota) वितरण वरील प्रमाणे करण्यात यावे.**
- **ज्या मतपत्रिकांमध्ये द्वितीय / पुढील पसंतीची मते नोंदविली नसतील अशा मतपत्रिका पुढील मतमोजणीसाठी संपुष्टात (Exhausted) येतील.**

- अधिकचे मुल्य (Surplus Quota) वाटपाच्या वेळी दोन किंवा अधीक उमेदवारांना एक सारखी मतसंख्या असेल तर प्रथम कुणाला अधिकचे मूल्य (Surplus Quota) वाटावे यासाठी प्रथम पसंतीची मते ज्या उमेदवारास जास्त असतील अशा उमेदवाराचे अधिकचे मुल्य (Surplus Quota) पहिल्यांदा वाटावे जर दोन उमेदवारांची प्रथम पसंतीच्या संख्या सारखी असेल तर अशा वेळी त्या पुढील फेरीमध्ये ज्या उमेदवारांची मते कमी असतील असा उमेदवार (Eliminate) होईल.

- Surplus Quota वितरीत करण्याकरीता सर्व फेऱ्यांमध्ये सारखी मते असल्यास ईश्वर चिठ्ठीचा वापर करण्यात यावा. ज्या उमेदवारांच्या नावाची ईश्वर चिठ्ठी निघेल अशा उमेदवारांचे अधिकचे मुल्य (Surplus Quota) प्रथम वाटावे.
- ज्यावेळी पहिल्या पसंतीच्या मुळ मतातील अधिकची मते हस्तांतरीत करावयाची असतात त्यावेळी अधिकच्या मतांच्या संख्येला न संपलेल्या मतपत्रिकेच्या संख्येने भागून मताचे मूल्य ठरविण्यात यावे. याप्रमाणे आलेल्या मूल्यानुसार ती पुढील पसंतीप्रमाणे निवडून आलेल्या उमेदवारांना हस्तांतरीत होतील.
- प्रत्येक मतमोजणी फेरीनंतर उपगठ्ठ्यातील न संपलेल्या मतपत्रिकांचे मुल्य ठरविण्यात येईल.

या प्रक्रियेत अधिकच्या मूल्यातील (Surplus Quota) अंशा प्राप्त करून जर उमेदवार निर्धारित मूल्य (Quota) पूर्ण करून निवडून आला तर तसे घोषित करून अशा उमेदवारास प्राप्त झालेल्या अधिकच्या मुल्याच्या (Surplus Quota) वितरण फक्त मिळालेल्या मुल्याच्या (Surplus) अशांमधून (Parcel) करण्यात यावेत. त्याला मिळालेल्या मूळ मतपत्रिका या प्रक्रियेत अंतर्भूत होणार नाही व या मतपत्रिका अंतिमरित्या वापरण्यात आल्या असे समजण्यात येईल व हा पूर्ण गठ्ठा (Parcel) पुढील मतमोजणीत समाविष्ट राहणार नाही. फक्त शेवटच्या प्राप्त मतपत्रिकाच पुढे चालू राहतील.

४. **उमेदवारांना मतमोजणीतून बाद करणे** (Elimination/Exclusion)

- वरील सर्व प्रक्रियेनंतर आवश्यक संख्ये ऐवढे उमेदवार निवडून न आल्यास ज्या उमेदवाराला सर्वात कमी मतसंख्या असेल अशा उमेदवारास मतमोजणीतून बाद करण्यात यावे व त्याच्या मतांची वाटणी शर्यतीत राहिलेल्या उमेदवारांमध्ये करण्यात यावी. या मतांची वाटणी खालील प्रमाणे.
- त्या उमेदवाराला मिळालेल्या प्रथम पसंतीच्या मतांच्या मूल्यांची वाटणी प्रथम करणे.
- त्यानंतर त्या उमेदवाराला मिळालेल्या मतपत्रिकेच्या गठ्ठ्यांची (Parcel) विभागणी ज्या क्रमाणे मिळाले त्याच क्रमाने व मुल्याने करावी.

- या प्रक्रीयेत शर्यतीत असलेल्या उमेदवारांपैकी एखादा उमेदवार ज्या मतपत्रिकेच्या गठ्‌ठ्यामुळे (Parcel) निवडूण येईल त्या गठ्‌ठ्यांच्या (Parcel) पुढील गठ्‌ठ्यांमधील (Parcel) मतांचे वाटप करतांना त्या निवडूण आलेल्या उमेदवाराला पुढील मतांचे वाटप न करता अशा मतांचा पुढील पसंती क्रमांक लक्षात घेवून शर्यतीतील उर्वरित उमेदवारांना वाटप करण्यात यावे.

समजा बाद करण्याच्यावेळी (Elimination) दोन किंवा अधीक उमेदवारांना एक सारखी मतसंख्या असेल तर प्रथम कुणाला बाद (Eliminate) करावे यासाठी प्रथम पसंतीची मते ज्या उमेदवारास कमी असतील असा उमेदवार पहिल्यांदा बाद (Eliminate) होईल. जर दोन उमेदवारंची प्रथम पसंतीच्या मतांची संख्या सारखी असेल तर अशा वेळी त्यापुढील फेरीमध्ये ज्याला कमी मते असतील असा उमेदवार (Eliminate) होईल. सर्व फेऱ्यांमध्ये सारखी मते असल्यास उमेदवार बाद करण्यासाठी ईश्वर चिठ्ठीचा वापर करण्यात यावा. ज्या उमेदवाराच्या नावांची ईश्वरचिठ्ठी निघेल असा उमेदवार बाद (Eliminate) होईल.

- ज्या मतपत्रिकांमध्ये द्वितीय / पुढील पसंतीचे मत नोंदविली नसतील अशा मतपत्रिका पुढील मतमोजणी करीता संपुष्टात (Exhaust) येतील.

- ज्यावेळी न संपलेल्या मतपत्रिकेचे मूल्य अधिकच्या मता ईतके किंवा त्यापेक्षा कमी असेल त्यावेळी अशा न संपलेल्या मतपत्रिका ज्या मूल्याने ती अधिकची मते मिळविणाऱ्या उमेदवारांना हस्तांतरीत होतील.

- ज्यावेळी न संपलेल्या मतपत्रिकांचे मूल्य अधिकच्या मतांच्या मूल्यापेक्षा जास्त असेल त्यावेळी अशा मतपत्रिकांचे मूल्य हे अधिकच्या मताला एकूण न संपलेल्या मतपत्रिकांच्या संखेने भागून येणाऱ्या भागाकारा ईतके असेल व त्या मतपत्रिका त्या मुल्याने पसंतीनुसार पुढील उमेदवारास हस्तांतरीत होतील.

- Result Sheet Demo
- Transfer Sheet Surplus
- Transfer Sheet Elem.
- Account of Voters.
- 1st Pre. Count
- 1st Pref. Count

# धन्यवाद!